# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १५०/२००८ दिनांक :

१) श्री. सुरेंद्र भरमू मगदूम व अन्य पाच ग्राहक,
गट नं. ११०२, मु.पो. अतीत
ता. जि. सातारा अपेलेंट
.

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडल कार्यालय, सातारा.

२) कार्यकारी अभियंता(संवसु)
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. विरूध्द पक्षकार
सं.व सु विभाग, सातारा

३) सहाय्यक अभियंता (संवसु).
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
ग्रामीण उपविभाग, सातारा

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे

**कोरम** :- १) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

श्री. सुरेंद्र भरमू मगदूम व अन्य पाच ग्राहक गट क्र. ११०२ मु.पो. अतित, जि. सातारा यांनी त्यांचे त्या ठिकाणी पूर्वी असलेल्या यंत्रमाग कनेक्शनला लोड शेडींग व सिंगल फेज कारणामुळे दिवसा ८ ते १० तासच वीज पुरवठा मिळाला. त्यामुळे त्यांचे उत्पादन तोट्यात जाऊन नुकसान झालेने, कनेक्शन बंद केली गेली.



या बाबत नव्याने कनेक्शन देणेस अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सातारा याजंकडे विहित नमुन्यात तक्रार दाखल केली होती. त्या कामी कक्षाने दिनांक ४–२–२००८ रोजी दिलेला निर्णय मान्य न झालेने त्यांनी मंचाकडे अपील दाखल केले आहे.

सदर प्रकरणाची सुनावणी दिनाक २५–३–२००८ रोजी म.रा.विद्युत वितरण कंपनी, सातारा मंडल कार्यालय, सातारा येथे १५–१५ ते १६–२० या वेळेत ठेवण्यात आली. त्यावेळी स्वत: तक्रारदार श्री. सुरेंद्र भरमू मगदूम,वि.प. तर्फे डी.डी. धुमाळ, श्री. व्ही.एस. जगताप, मंडल कार्यालय, सातारा, श्री. घारगे, कार्यकारी अभियंता, श्री.एस.के.पाटील. कार्यकारी अभियंता, विभागीय लेखापाल, सातारा विभाग, जे.जे. माने, सहा.अभियंता, सातारा विभाग, व्ही.आर.देशमुख, सहा.अभियंता, ग्रामीण उप विभाग, सातारा, आर.डी. लड्डा, सहा.लेखापाल, ग्रामीण उप विभाग, सातारा हे उपस्थित होते.

अपीलदाराचे म्हणणे व तक्रारीचे स्वरूप सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे आहे.

अर्जदार श्री. सुरेंद्र भरमू मगदूम व अन्य पाच सौ. जयश्री सुरेंद्र मगदूम, सुमती भरमू मगदूम, श्री. महावीर भरमू मगदूम, श्री कुबेर भरमू मगदूम व सौ. भाारती महावीर मगदूम यांचे नांचे गट क्र. ११०२, मु.पो. अतित, जि. सातारा याठिकाणी श्री. के.बी. मगदूम यांची १३ अश्वशक्ती तर इतर सर्वांचे प्रत्येकी १९ अश्वशक्ती अधिक लायटिंगसाठी ६ केडब्ल्यूची एक अशी यंत्रमाग वीज कनेक्शन १९८३ पासून होते.

सदर सर्व औद्योगिक यंत्रमागधारक कनेक्शनला ११० केव्ही अतित उपकेंद्रातून निघणा–या ११ केव्ही उंब्रज फिडरवरून वीज पुरवठा दिलेला होता. २००० सालापासून तेथे हळूहळू भार नियमन लागू करणेस सुरूवात झाली. सुरूवातीस २ तास असणारे भार नियमन २ वर्षामध्ये ४ तास झाले. त्यातच २००५ पासून त्या फिडरवर सिंगल फेज लागू केले. भारनियमनामुळे त्यांचे उत्पादनाचे नुकसान होत होते व त्यांनी वेळोवेळी या अडचणीवर पर्याय शोधणेस वितरण कंपनीकडे पत्र–व्यवहार केला आहे. अलिकडे थकित वीज बिलामुळे सर्व कनेक्शन्स दिनांक २८–६–२००६ रोजी कायमस्वरूपी बंद करण्यात आली आहेत. त्याचठिकाणी नव्याने

लोडशेडिंग विरहित वीज पुरवठा मिळावा अशी मागणी आहे व वितरण कंपनीने या कामी स्वतंत्र फिडर टाकणेस येणारा खर्च भरणेस मी तयार असल्याचे अंडरटेकिंग रू.१००/–चे स्टॅंम्प पेपरवर लिहून दिले आहे.

तसेच या बाबत सलग वीज पुरवठा मिळणे करिता वेळोवेळी वितरण कंपनीकडे अर्ज दि. २९–७–२००२, २२–८–२००३, १२–२–२००५, १५–१०–२००५,३–५–२००६, १२–१२–२००५ व दिनांक १–८–२००७ ने अर्ज केलेले आहेत. वरिष्ठ अधिकारी तथा मुख्य अभियंता (कोप) कोल्हापूर यांनी मंत्री महोदयांच्या पत्रातील सूचनानुसार या बाबत कार्यवाही करणेच्या सूचना पत्र क्र. ८०८९ दिनांक १०–११–२००८ अन्वये क्षेत्रिय कार्यालयांना दिल्या होत्या.

तसेच कार्यकरी अभियंता, सातारा यांनी पत्र क्र. काअ/२१४१ दिनांक २६–९–२००५ व ३१४६ दिनांक १०–११–२००५ ने कार्यवाही करीत असले बाबत मला कळविणेत आले व भार नियमनातून सुटका मिळणे करिता गांभीर्याने पर्यायी व्यवस्था करण्यात आली नाही व तक्रारीचा मुद्दा तसाच राहिला आहे.

या बाबत वितरण कंपनीचे वतीने बाजू मांडण्यात आली.

सदर वीज जोडण्या दि. ५–११–०५ पासून बंद आहेत व वीज बील थकबाकीमुळे दि.२८–६–२००६ रोजी कायमस्वरूपी बंद करण्यात आली आहे. सदर उच्चदाब प्रकारचे युनिट दिनांक २७–९–१९८३ ला थकबाकीत होते व त्यांस लघुदाब परावर्तीत करून यंत्रमाग चार अधिक एक लायटिंग कनेक्शन देण्यात आलेचे सांगण्यात आले.



सदर वीज जोडण्या ज्या ११ केव्ही फ़िडरवर जोडल्या आहे त्यास भारनियमन लागू आहे. या बाबत मुद्दा सोडविणेस स्वतंत्र झालेल्या महापारेषण कंपनीकडे संबंधित ग्राहकास स्वतंत्र ११ केव्ही फ़िडर उपलब्ध केला जावा यासाठी महावितरणकडून पत्र–व्यवहार केला असता प्रकरणास त्यांचेकडून नकारात्मक प्रतिसाद मिळाला.

या बाबत ३३/११ केव्ही अतित उपकेंद्रा शेजारील जागा मिळावी अशी पारेषण कंपनीकडे मागणी केली आहे. सदर जागा उपलब्ध झालेस त्यात३३/११ केव्ही उपकेंद्र उभारणी करून अर्जदारास वीज पुरवठा करता येईल असे सांगितले.

सुनावणीच्यावेळी केलेली कथने, मुळ तक्रार, उपलब्ध कागदपत्रें या सर्वांचा एकत्रित विचार करता मंच खालील निष्कर्षाप्रत आला आहे.

ग्राहकाने अधीक्षक अभियंता, सातारा यांना दि. २९–७–२००२ च्या पत्राने लोड शेडींग मधून आपणांस बाजूला करावे व अखंडीत वीज पुरवठा करावा अशी मागणी केलेली दिसून येते. त्यास दि. १९–८–२००२ ला सहाय्यक अभियंता यांनी तसेच दिनांक २१–८–२००२ ला अधीक्षक अभियंता, सातारा यांनी उत्तर दिल्याचे दिसून येते. ग्राहकाने सातत्याने आपल्या मागणीचा पाठपुरावा केलेला दिसून येतो. लोड शेडींग नंतर सातारा जिल्ह्यात २००५ पासून सिंगल फेजींगची योजना अमंलात आल्यामुळे थकबाकीमुळे सदरचे युनिट २००५ पासून पूर्णत: बंद झाले आहे. दरम्यानच्या काळात मध्यंतरी मंत्री महोदयांच्या पत्रामुळे मुख्य अभियंता, कोल्हापूर यांनीही दिनांक १०–११–२००३ रोजी सातारा मंडल, कार्यकारी अभियंता यांना पत्र लिहिल्याचे दिसून येते. दिनांक २९–७–२००२ ते आजअखेरचा कालखंड याचा विचार करता पूर्वीच्या म.रा.वि.मंडळाने व आताच्या वीज वितरण कंपनीने अखंडीत वीज पुरवठ्यासाठी निर्णायक कार्यवाही केलेची दिसून येत नाही. वीज मंडळ विभाजनापूर्वी म्हणजेच मे,२००५ पर्यंत मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी एकत्रित बसून गृामीण भागात रोजगार उपलब्ध करून देणारा उद्योग वाढविण्याचा प्रयत्न केलेचे दिसून येत नाही. त्यातच विभाजनानंतर

सरचे अतित ११० केव्हीचे सब स्टेशन पारेषण कंपनीकडे गेल्याने प्रश्न मार्गी लागण्यापेक्षा त्यात अधिक क्लिष्टताच निर्माण झाली आहे. सदर ठिकाणावरून स्वतंत्र फिडरवरून पुरवठा देणेस आज पारेषण कंपनीचा विरोध आहे. त्यामुळे सदर उपकेंद्राजवळ वितरण कंपनीच्या मालकीच्या जागेत स्वतंत्र फिडर उभे करणे आवश्यक आहे. मंचाने त्यासाठी जागेची पाहणी केली. त्याचप्रमाणे कार्यकारी अभियंता यांना सदरचा प्रस्ताव सर्व बाजूंनी विचार करून मंजूर करून घ्यावा म्हणून मार्गदर्शन केले. तथापी आजमितीस वितरण कंपनीने कोणतीच उचित कार्यवाही केलेली दिसत नाही. ग्राहकाने करावयाच्या खर्चास संमत्ती दिली आहे. त्यामुळे परिमंडल कार्यालय ते शाखा कार्यालय या सर्व स्तरावर वेगवेगळ्या पर्यायांचा विचार होवून कमी खर्चाचा व जलद गतीने पूर्ण होणारा प्रस्ताव त्वरीत मंजूर होवून तशी कार्यवाही होण्याची निकड आहे. त्यासाठी वितरण कंपनीच्या कोल्हापूर परिमंडलातील मुख्य अभियंता व त्यांचे सहकारी तसेच पारेषण कंपनीतील अधिकारी यांची संयुक्त बैठक घेवून तोडगा काढावा असे मंचाचे मत आहे.

या बाबत अभ्यास व वस्तुस्थितीची पाहणी करण्या करिता अतित उपकेंद्राला मंचाला दि. २–५–२००८ रोजी भेट द्यावी लागली. तसेच पारेषण कंपनीकडून ३३ केव्ही उपकेंद्रासाठी जागा प्राप्तीसाठी मुख्य अभियंता (कोप) कोल्हापूर यांचेशी दिनांक १२–६–२००८ रोजी बातचित केली. महावितरणची तेथील उपलब्ध जागा अधिक महापारेषणकडील मागणीची जागा अशा एकत्रित क्षेत्रावर नियोजित उपकेंद्राचा योग्य आराखडा होणे व यंत्रणा उभी होणे याची निश्चिती आहे का ? किंवा महापारेषणची जागा न मिळालेस ग्राहकाच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी अन्य पर्याया तजविज केली आहे का ? हे कार्यकारी अभियंता, सातारा यांचेकडून अद्याप पावेतो समजले नाही. या कारणांमुळे निकालपत्र मुदतीत पारित करण्यास विलंब झाला आहे.



## आदेश

१) वितरण कंपनी व पारेषण कंपनीतील मंडल कार्यालय ते परिमंड्ळ कार्यालया पर्यंत सर्व संबंधित वरिष्ठांनी एकत्रित बसून वितरण कंपनीने सादर केलेला प्रस्ताव क्र. ईई/एसटीआर/टी १४/०७–०८/०९३९ दिनांक ११–२–२००८ किंवा कोणत्याही इतर अन्य मार्गानी कमीत कमी खर्चात आदेशाच्या तारखेपासून १ वर्षाच्या आंत अखंडीत वीज पुरवठ्यासाठीची योजना कार्यान्वीत करावी.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी करणेत यावी व ती केलेची महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ कलम ८–७) च्या तरतुदीनुसार मंचास कळविण्यात यावे.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपिल करावयाचे असल्यास आदेशाच्या तारखेनंतर ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल, बांद्रा– कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई– ५१ याजकडे करता येईल.

(जी. सी. लेले)
सदस्य
ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर

(एस.आर.बांबळे)
सदस्य सचिव
ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर


150 of 2008

महावितरणची तेथील उपलब्ध जागा अधिक महापारेषणकडील मागणीची जागा अशा एकत्रित क्षेत्रावर नियोजित उपकेंद्राचा योग्य आराखडा होणे व यंत्रणा उभी होणे याची निश्चिती आहे का ? किंवा महापारेषणची जागा न मिळालेस ग्राहकाच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी अन्य पर्याया तजविज केली आहे का ? हे कार्यकारी अभियंता, सातारा यांचेकडून अद्याप पावेतो समजले नाही. या कारणांमुळे निकालपत्र मुदतीत पारित करण्यास विलंब झाला आहे.